Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# संत तुकारामांच्या अभंगातील प्रतिकात्म विचारमूल्ये

**डॉ. मधुकर नंदनवार**
प्राध्यापक, मराठी
भिवापूर महाविद्यालय भिवापूर
भ्र. ध्वनी. 9423634015
E-mail -
madhukarnandanwar0@gmail.com

---

**सारांश :**

*वारकरी संप्रदायाचा कळस ठरणारे जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा जन्म पुण्याजवळील देहू या गावी इ.स. 1608 मध्ये झाला. संत तुकाराम महाराज हे मातापित्याचे मधले अपत्य. त्यांचे घराणे ऐपतदार आणि प्रतिष्ठित. घरी सावकारी,किराण्याचे दुकान, उ-तम व्यापार, उपजाऊ शेतीवाडी असे संपन्न वातावरण. धार्मिक वृÚतीच्या माता पित्याने तुकोबांचा वयाच्या पंधराव्या वर्षी विवाह केला. त्यांचे सुरूवातीचे जीवन सुखाचे व समाधानाचे गेले. वयाच्या 21 व्या वर्षी त्यांच्यावर दुःखाचे डोंगर कोसळले. मातापित्यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. सगळीकडे हाहाकार माजला. या दुष्काळाची झळ संत तुकारामाच्या कुटुंबाला बसली. थोरली पत्नी रखुमा व मुलगा संताजी या दुष्काळात भुकेने व्याकूळ होऊन तडफडत मरण पावली. तुकारामाची देणी बुडाली. कालचा सावकार आज कफल्लक झाला. एका सज्जन, पापभीरू, प्रामाणिक पुरुषाची समाजात निंदानालस्ती सुरू झाली. या दुष्काळाने संत तुकारामाला अंर्तमुख बनविले. संसाराकडून परमार्थाकडे वाटचाल होऊन त्यांच्या ख-या आध्यात्मिक जीवनाला सुरूवात झाली. संत तुकारामाचे सुमारे साडेचार हजार अभंग उपलब्ध आहेत. या अभंगातून तुकारामाचे जीवनानुभव व्यक्त झाले आहेत. त्यामूळे ते आपल्या अभंगातून जीवनाचे तत्वज्ञान मांडताना स्वगते बोलतात. या सर्व स्वगतांचे एकत्रित रुप म्हणजे त्यांची अभंगगाथा होय. ही गाथा म्हणजेच महास्वगत आहे त्यांच्या वाणीचे ते बोल आहेत. विंदा करंदीकरांच्या मते, 'भरलेल्या भिमेकडून। तुकोबाची माळ घ्यावी' म्हणजे जीवन ही भीमा असून तिच्यात तुकोबांचे अभंगमणी विखुरलेले आहेत. आपण ते मणी गोळा करून त्यांची माळ गुफायची असते. संत तुकारामांनी अनेक प्रतिके वापरून आपल्या अभंगाचा अविभाज्य शैलीविशेष बनविलेला आहे. सोळाव्या शतकात वापरलेल्या प्रतिकांमुळेच आजच्या काळातही तुकोबाची अभंगवाणी जीवनाला व्यापणारी, चिरंतन व प्रेरणादायी ठरलेली आहे.*

**बीज शब्द :** संत तुकाराम, अहंकार, प्रतिकात्मकता,तत्वज्ञानी कवी, अभंगाची महती.

---

संत तुकारामांच्या वैयक्तिक जीवनातील प्रतीकात्मकता- संत तुकारामांचे विचारधन ज्यात साठविले आहे ती म्हणजे अभंगगाथा. तुकारामाला स्वतःच्या जीचनाची सार्थता पटली. त्यांच्या अभंगात ते विशद करतात. संत तुकारामांच्या 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' या अभंगाचा काही लोक वेगळा आषय व्यक्त करतात.एखाद्या

रुग्णाची प्रकृती खूपच बिघडली की लगेच ‘आपुले मरण पाहिले म्या डोळा’ असे म्हणतो हे सर्वस्वी चुक आहे. संत तुकाराम म्हणतात की, मृत्युचा हा सोहळा असतो तो अनुपम आसतो. तो लौकिक मरणाचा सोहळा होत नसतो.

‘आपुले मरण पाहिले म्या डोळा। तो जाहला सोहळा अनुपम्य।।1।।
आनंदे दाटली तिन्ही त्रिभुवने। सर्वात्म कारणे भोग जाला।।धृ।।
एकदेशी होतो अहंकारे आथिला। त्याच्या त्यागे झाला सुकाळू हा।।2।।
फिटले सुतक जन्म मरणाचे। मी माझ्या संकोचे दुरी जालो।।3।।
नारायणे दिला वस्तीस ठाव। ठेवूनिया भाव ठेलो पायी।।4।।
तुका म्हणे दिले उमटुनि जगी।घेतले ते अंगी लावुनिया।।5।।

या अभंगात ‘मी’ म्हणजे ‘अहंकार’. अहंकार मेला तो सोहळा अनुपम्य होता. आता हा आनंद त्रिभुवनात मावत नाही. वैयक्तिक अहंकारामुळे मी संकुचित होतो. अहंकाराच्या त्यागाने मी विश्वात्मक झालो. यामुळेच जन्ममरणाची संवेदना, सुखदुःखे नाहिशी झाली. देवाने पायाषी जागा दिली. ‘मी’ त्यांच्या पायावर निष्ठा वाहिली. यातली प्रतिकात्मकता ‘मी’ म्हणजे अहंकार ही होय. ‘हे माझे आहे, हे मी केले, हे कर्तृत्व माझे आहे’ असे आपण नेहमी बोलत असतो. या अहंकारी वृÚतीमुळे घरात भांडणे होतात आणि समाजात वशिलेबाजी व भ्रष्टाचार निर्माण होतात. न्याय अन्यायाची चाड राहत नाही आणि देशादेशातही यामुळेच लढाया होतात. अहंकार अनेक अनार्थाचे कारण असते. ‘‘आपुले मरण पाहिले म्या डोळा। तो जाहला सोहळा अनुपम्य’’ अशा रितीने तुकाराम एकदम परमात्म्याशी एकरूप होऊन आत्मविसर्जनही करतात.’’1 ही सत्यता पटते.

संत तुकारामांच्या अनेक अभंगातून याचा प्रत्यय येतो. जसे ‘सत्य असत्यासी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।। यालाच गांधीजी आतला आवाज म्हणतात. ‘कायसा गुणदोष पाहू आणिकाचे। मज काय त्याचे उणे असे।। किंवा ‘रात्रंदिवस आम्हा युध्दाचा प्रसंग’ हे अनुभव तर आजही येत असतात. जसे बोलणे तसे वागणे हे तत्व गंगेच्या प्रतिकातून सांगताना तुकोबा म्हणतात, ‘गंगाजळा पा। पाठी पोटी नाही।। संकटाचे स्वागत करा कारण‘ साहोनिया टाकी घाये। पाषाण देवचि झाला पाहे।। तुमच्या गुणांची जाहिरात करण्याचे कारण नाही. ‘न लगे चंदना सांगावा परिमळ। वनस्पती मेळ हाकारुनी।।’ शब्द बिजापोटी फळे रसाळ गोमटी।। आपण माणूस म्हणून जन्माला आल आहोत. थोडातरी उपकार करावा असे सांगताना नका घालू दूध जयामध्ये सार। ताकाचे उपकार तरी करा।। मुंगी आणि साखर यांचे प्रतिके घेऊन तुकोबा म्हणतात, ‘लहानपण दे गा देवा। मुंगी साखरेचा रवा। निखळ प्रेमाची वास्तविकता स्पष्ट करताना राधेने कृशणाला कधी प्रेमाविषयी सांगीतले नाही कारण ‘प्रेम नये सांगता, बोलिता, दाविता। अनुभव चिÚता चिÚत जाणे। कोणत्याही काळात तुमची योग्यता अबाधित राहावी हे हिÚयाच्या प्रतिकातून सांगताना संत तुकोबा म्हणतात,‘ हिरा ठेविता काळे गहाण। मोल न तुटे दुकाळी जाण।। खरी योग्यता नसेल तर ‘ आदित्याची झाडे। काय त्यांचा उजेड पडे।’ अषी गत झाल्याशिवाय राहत नाही. ही अनेक उदाहरणे अभंगगाथेत साठविलेली आहेत ते संत तुकारामाच्या जीवनानुभवाचे प्रत्यक्ष बोल आहेत.

कौटुंबिक व राजकीय स्वरूपाची प्रतिकात्मकता- संत तुकारामांच्या अभंगगाथेत अनेक घरघुती

दाखल्यातून कौटुंबिक व राजकीय स्वरुपाची प्रतिकात्मकता दिसून येते.

बाईल चालली माहेरा। संगे दिधला म्हातारा।।1।।
सिधा सामग्री पोटाची। सवे स्वारी बइलाची।।धृ।।
जाता पाडिली ढोराने। शिव्या देती अन्योविन्ये।।2।।
न सावरी आपणाते। नग्न सावले वरते।
फजित केले जनलोकी। मेला म्हणे नरकी।।4।।
गोहाची हे गेली लाज। गांजिता का तुम्ही मज।।5।।
तुका म्हणे जनी। छीः थू केली विटंबणी।।6।।
संत तुकारामांची अभंगगाथा (अ.क्र. 4477)2

वरिल अभंगात ''बायको माहेरी जायला निघाली. तिचे रक्षण करण्यासाठी सोबत एका म्हाताÚयाला दिले. तिने जेवणासाठी सर्व शिधा सामग्री घेतली. त्यांच्यासोबत एक बैलही होता. रस्त्याने जातांना तिला बैलाने पाडले. तिला तोल सावरता आला नाही. तिने वाटेल तशा शिव्या दिल्या. तिचे लुगडे वर गेले होते त्यामुळे ती नग्न झाली होती. ती चिडली आणि त्या म्हाताÚयाला म्हणाली की, तुम्ही साÚया लोकांमध्ये माझी फजिती केली. तुम्ही नरकात पडाल. माझी लाज गेली. मला तुम्ही असे का गांजता? संत तुकाराम म्हणतात की सा-या लोकात तिची विटंबना झाली.'' या संपूर्ण अभंगातून प्रतिकात्मकता स्पष्ट होते की, बाई (स्त्री) माहेरी निघाली म्हणजेजनतेला सुखासमाधानाचे जीवन पाहिजे आहे आणि म्हणून तिला जायचेआहे. बैल म्हणजे गावगुंड होत. ते जनतेचीबेइज्जत करीत असतात. असे होऊ नये म्हणून शासनाने अधिकारी नेमले आहेत. म्हातारा म्हणजे हे पोलीस व अन्य अधिकारी होत. पण तिचे रक्षण करायला असमर्थ आहेत कारण ते म्हातारे आहेत म्हणजेच ते अक्षम्य, दुर्बल ठरले आहेत. याचा अर्थ असा की, ''रक्षक कोणत्याही क्षेत्रातला असो, तो अकार्यक्षम म्हातारा नको. हे तत्व आजच्या काळातही लागू पडणारे आहे.''3

अशाच प्रकारची राजकीय प्रतिकात्मकता 'अधमासी तो अधम', 'आपुलिया वळे मी नाही बोलत' या अभंगातून आलेली आहे. सामाजिक व राष्ट्रीय प्रतिकात्मकता- संत तुकारामांनी जातीभेद व वर्णभेदावर अनेक प्रतिकात्मक अभंग दिले आहेत हे खालील अभंगातून हे दिसून येते.

'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभद भ्रम अमंगळ।।1।।
आईका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा।।धृ।
कोणाही जिवाचा न घडो मत्सर। वर्ग सर्वेश्वर पूजनाचे।।2।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव भोग पावे।।3।।

हे संपूर्ण जग विष्णुमय आहे. याची जाणीव ठेवणे हाच वैष्णवांचा धर्म आहे. भेदाभेद हा अमंगळ भ्रम आहे. तुम्ही भागवत ऐका आणि जे सत्य व हिताचे तेच करा. कोणाचाही मत्सर करू नका. कारण तेच खरे परमेश्वर पूजनाचे वर्म होय. ज्ञानेंद्रिये असोत की कर्मेंद्रिय, ती सर्व इंद्रिये एकाच देहाची असतात. ते एकाच देहाचे अवयव असतात. त्यांचे सुख, दुःख जीवाला भोगावे लागतात.

राष्ट्रीय एकात्मतेचे सूत्र सांगताना तुकोबा आपल्या अभंगात प्रतिकात्मकता विशद करताना सांगतात की, भेदाभेद करणे हा भ्रम होय आणि हा भ्रम अकल्याण करणारा अमंगळ आहे. राष्ट्राच्या एका अवयवाला, एका घटकाला जे सुख दुःख होते ते सर्व राष्ट्राला भोगावे लागते. म्हणूनच भारताच्या एका विशिष्ठ प्रदेशातल्या मुलाला जागतिक क्रीडा स्पर्धेत एखादे पदक मिळाले की केवळ त्या प्रदेशालाच नव्हे तर संपूर्ण भारताला आनंद होतो आणि केरळमध्ये महापूर आला तरी संपूर्ण भारताला दुःख होऊन इतर सर्व प्रदेश केरळला मदतीचा हात देतात. एका अवयवाला झालेले दुःख संपूर्ण देहाला भोगावे लागते. तुकोबांच्या काळात स्पृश्यास्पृश्य हा भेदभाव शिगेला पोचला होता. तो नष्ट झालाच पाहिजे असे संत तुकोबांना वाटत होते. या संदर्भात डॉ. कोमल ठाकरे आपल्या 'सामाजिक समतेचे पुरस्कर्ते: संत तुकाराम' या लेखात लिहितात, ''हे जग विश्णुमय असून तेथे भेदभाव करणे हा अमंगळ भ्रम आहे आणि असे मानणे हाच वैष्णवाचा धर्म होय. कोणाही जीवाचा मत्सर न करणे हे सर्वेष्वर पूजनाचे रहस्य आहे. विठ्ठलाच्या ठिकाणी भेदभाव नाही. त्याला सगळे भक्त सारखे असतात. तो भक्तांची जन्मजात पाहत नाही तर त्याच्या ठिकाणी असलेला शुध्द भाव महत्वाचा मानतो. या तुकारामांच्या भक्तिमार्गातूनच त्यांचा भूतदयावाद सहज व स्वाभाविकपणे जन्माला येतो.''4 हे वास्तव सत्य आहे.

तुकोबा 'लोभाचे मांजर' या प्रतिकातून सांगतात की, कीर्तनकार केवळ दक्षिणेच्या लोभाने कीर्तन करतात. म्हणून वक्ता व श्रोता दोघेही रितेच राहतात. संत तुकारामांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' या षब्दात जणू वनीकरणाची हाक मानवाला दिली आहे. 'तोवरि तोवरि जंबुक करी गर्जना। जोवरि जोवरि सिंहगर्जना ऐकली नाही' हे केवळ ज्ञानी लोकांचे प्रतिक आहे. ध्येयनिष्ठ माणूस राजकारणात कसा भ्रश्ट होत जातो हे ' ढेकणाच्यासंगे हिरा जो भंगला' या प्रतिकातून स्पष्ट होते. 'मुलाम्याचे नाणे। तुका म्हणे नव्हे सोने।।' 'जाली गाढवी दुधाळ। महिमा गाईचा पावेल?' आवडे सकळा मिष्ठान्न। रोग्या ते विषसमान' अशा अनेक अभंगातून सामाजिकतेची प्रतीकात्मकता विशद झाली आहे.

तत्वनिष्ठ प्रतीकात्मकता-संत तुकारामांच्या खालील अभंगात 'तू' या शब्दातून प्रतीकात्मकता व्यक्त होताना दिसते.

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती। चालविसी हाती धरुनिया ।।1।।
चालो वाटे आम्ही तुझाचि आधार। चालविसी भार सवें माझा ।।धृ।।
बोलो जाता बरळ करिसी ते नीट। नेली लाज धीट केलो देवा ।।2।।
अवघे जन मज जाले लोकपाळ। सोइरे सकळ प्राणसखे ।।3।।
तुका म्हणे आता खेळतो कौतुके। जाले तुझे सुख अंतर्वाही ।।4।।

मी जेथे जेथे जातो तेथे तेथे तू माझ्यासोबत असतोस. मला तू माझा हात धरुन चालवतोस. तूच माझा आधार आहेस. माझा सर्वभार तूच वाहतोस. मी बाळ आहे म्हणून काहीही बरळत सुटतो, पण तू मला सावरून घेतोस. म्हणून मी निर्भय झालो आहे आणि माझ्या बदलण्यालाही कवित्व आले आहे. 'आता तुझ्यामुळे सारे लोक माझे सोयरे व प्राणप्रिय मित्र झाले आहेत. तुझ्यामुळेच अंतर्बाहिा सुखत लोळण्याचे भाग्य माझ्या वाट्याला आले आहे असे सांगतात.

'तू' हा शब्द प्रतीकात्मक असल्याचे वरील अभंगातून स्पष्ट करताना आई लहानशा बाळाला सांभाळते तेव्हा तो काय करतो आहे, जेवला की नाही, त्याला झोप आली आहे काय, त्याला काय हवे काय नको आहे हे पाहण्यासाठी आई सतत त्याच्या सोबतीला असते. त्याला सू लागली तरी तो आईचा पदर धरतो आणि विजेचा कडकडाट झाला तरी आईच्या पदराखाली लपतो. तो आईमुळेच मोठा होत असतो. संत तुकाराम, नामदेवादी सर्व संत संतत्वाच्या थोर पदाला पोचले कारण ते जेथे जातील तेथे विठ्ठल त्यांच्या सोबतीला होता. त्यांना केवळ विठ्ठलाचाच ध्यास लागला होता. ध्येयवादी माणसाचे असेच असते. कारण त्यांना आपल्या ध्येयाचा चोवीसही तास ध्यास लागलेला असतो. जोतीबा फुले जेथे जातील तेथे आपल्या शेतकरी उन्नतीच्या, स्त्री शिक्षणाच्या व अस्पृश्यता निवारणाच्या ध्येयाने प्रेरित असत म्हणूनच ते महात्मा बनले. तुरुंगात जाऊनही बाळ गंगाधर टिळकांनी आपले ध्येय सोडले नाही. त्यांचे ध्येय त्यांच्या सांगातीच होते. म्हणून तुरुंगातही त्यांनी गीता रहस्य लिहिले. ते लोकमान्य ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेथे जातील तेथे दलितांना न्यास मिळवून देणे हे त्यांच्या सोबत होते. म्हणून ते भारतरत्न झाले.

म्हणूनच 'तू' हे प्रतीक आईचे असो, देवाचे असो किंवा जीवन ध्येयाचे असो, 'जेथे जातो तेथे, हा 'तू' हा सांगाती असेल तर आणि खरेतर थोर बनू शकतो. हे वरिल उदाहरणांवरून स्पष्ट होते.

ईश्वरी प्रतीक - हेचि थोर भक्ती आवडते देवा । संकल्पाची माया संसाराची ॥1॥
ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे समाधान ॥धृ॥
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भेगणे ते फळ संचिताचे ॥2॥
तुका म्हणे घालू तयावरी भार । साहू हा संसार देवा पायी ॥3॥

या अभंगातून अनंत हे प्रतीक ज्याला अंत नाही ईष्वराचे जसे आहे तसेच ते आमच्या अनंत ध्येयासक्तीचे, अनंत आशांचे आणि अनंत इच्छांचेही प्रतीक आहे. अनेक आक्षेपक अनंत म्हणजे परमेश्वर एवढा एकच अर्थ लक्षात घेतात वया अभंगावर दैववादाचा आरोप करतात. हा आक्षेप वस्तुस्थितीस धरून नाही. कारण वास्तविक हा अभंग पूर्णतया प्रयत्नवादाचा पुरस्कार करणारा आहे.

मनवी इच्छा अनंत असल्यामुळे त्या सर्वच पूर्ण होत नाहीत. मनासारखे सर्व घडून येत नाही. ज्यामुळे अनंतातून जेवढे आपल्या हाती आले तेवढ्यावर समाधान मानले तरच जीवन आनंदाने जगण्याची ऊर्जा मिळू शकते. न्यायमूर्ती म. गो. रानडे यांनीही हाच खरा अर्थ या अभंगाचा लावला आहे. जीवनातील वैराग्य व उद्वेग यावर मात कषी करावी, याचे आशावादी सूत्र या प्रतीकातून व्यक्त झाले आहे.

**समारोप :**

संत तुकाराम तत्वज्ञानी कवी होते. त्यांनी आपल्या अभंगातून वेदांत जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले. त्यांच्या अभंगातून भक्ती जशी ओथंबून वाहताना दिसते तसेच समाजातील विषमतेवर त्यांनी घाव घातले आहेत. त्यांनी समाजातील अंधश्रध्देवर कठोर प्रहार केले आहेत. एवढेच नव्हे तर ख-या साधु संताची ओळख पटवून देताना दीन दुःखी लोकांची सेवा करणे हाच परमेश्वराच्या प्राप्तीचा मार्गही विषद केला आहे.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले।।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।

यािप्रमाणे ख-या संताची ओळख करुन दिली व सकळ मानवाला सूजान करण्याचे कार्य संत तुकाराम महाराजांनी केले. संत तुकाराम हे चालते बोलते विद्यापीठ होते.त्यांच्या अभंगगाथेतील शेकडो अभंग सर्वसामान्यानाही आज मुखोद्गत आहेत. अभ्यासकांच्या मनीमानसी आपल्या आंतरिक भावसौंदर्याने रुंजी घालीत आहेत. याचे एकमेव कारण संत तुकोबाचा सामान्यांकडून असामांन्यापर्यंत झालेला वैचारिक व आध्यात्मिक प्रवास होय. असा वारकरी संप्रदायाचा कळस असलेले महान संत तुकाराम महाराज फाल्गुन वद्य व्दितीया, शके 1571 ला ब्रह्मलीन झाले. त्यांचे अभंग व विचारवैभव चिरंतन अजरामर ठरणारे आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**


- डॉ. किशोर सानप, प्रा. मनोज तायडे- तुकाराम व्यक्ति आणि कवित्व. लोकवाड्.मय गृह मुंबई दुसरी आवृती. 1996, (पृ.क्र.49)
- पुरुषोतम मंगेश लाड (संपा.) श्री. तुकारामबाबाच्या अभंगाची गाथा-शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय मुंबई. दुसरी आवृती. 1973, (पृ.क्र.731)
- डॉ. मनोहर रोकडे- संत तुकाराम अभंगवाणी, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे.2013 (पृ.क्र.10)
- डॉ. शरयू तायवाडे, डॉ. राजेंद्र वाटाणे, डॉ. कोमल ठाकरे (संपा.) युगप्रवर्तक संत: तुकाराम रामदास-विजय, प्रकाशन नागपूर-2010(पृ.क्र.83)